सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक** :२२५३/मरातांसे/असे(स्थापत्य)(मु.)/२०२२/१६ **दिनांक :- १७ मे, २०२३**

**- घोषणा -**

**विषय :-** 'महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा मुख्य परीक्षा -२०२२' मधील महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा या परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक २३ एप्रिल, २०२३** रोजी घेण्यात आलेल्या **'महाराष्ट्र राजपत्रित तांत्रिक सेवा मुख्य परीक्षा - २०२२'** मधील महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा या परीक्षेच्या प्रश्नपुस्तिका क्रमांक १ व प्रश्नपुस्तिका क्रमांक २ या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकेच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. सदर परीक्षेमधील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | **संच A** | **संच B** | **संच C** | **संच D** |
|---|---|---|---|---|
| **प्रश्नपुस्तिका क्रमांक १** | ७ | ८५ | ५२ | ४१ |
| | १० | ८८ | ५५ | ४४ |
| | ११ | ८९ | ५६ | ४५ |
| | १२ | ९० | ५७ | ४६ |
| | १३ | ९१ | ५८ | ४७ |
| | २० | ९८ | ६५ | ५४ |
| | २७ | ५ | ७२ | ६१ |
| **प्रश्नपुस्तिका क्रमांक २** | १९ | १ | ८३ | ५६ |

३. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावरील दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ व १ जुलै, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने व विहित शुल्काचा भरणा करुन हरकती सादर करणे आवश्यक आहे.

४. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती तसेच विहित शुल्काचा भरणा न केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा **दिनांक २२ मे, २०२३ रोजी २३.५९** वाजेपर्यंत सुरु राहील.

६. ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव

ठिकाण : नवी मुंबई. महाराष्ट्र लोकसेवा आयोग